**भा. पा. हिवाळे शिक्षण संस्था संचालित**

**ग्रामीण विकास अध्ययन केंद्र - समाजकार्य व संशोधन संस्था अहमदनगर,**

# विषयाचे नाव

# Employment issues during pandemic

## विद्यार्थिनीचे नाव


**धराडे छाया भास्कर**

**MSW द्वितीय वर्ष**

**सी.एस.आर.डी. समाजकार्य महाविद्यालय अहमदनगर.**

# क्षेत्रकार्य संस्था




## कार्य -

1. आरोग्य
2. शिक्षण
3. पायाभूत सुविधा

## ★ गावातील ग्रामपंचायतमध्ये कामकाज करणे.

गावातील ग्रामपंचायतीने काम करणे गावातील घरकुल योजनेचे फॉर्म भरून देणे गावातील लोकांची माहिती त्या लोकांना माहिती देणे वंचित लोकांना असणाऱ्या सवलती बाबत माहिती घेणे आणि लोकांना ते समजून देणे ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या योजनांचा लाभ घेण्यासाठी लोकांना संपूर्ण माहिती देऊन कागदपत्रे जमा करणे लोकांना कागदपत्र विषयी माहिती देणे संपूर्ण माहिती घेऊन ग्रामपंचायतीमध्ये पोहोचवणे त्याबाबत सरपंच आणि ग्रामसेवक यांच्याशी चर्चा करून ती माहिती ग्रामपंचायत मध्ये देणे





## ★ गावामध्ये महिला बचत गट तयार करणे.

**क्षेत्र कार्य करत असताना गावातील महिलांना एकत्र करून महिलांना बचत गटासाठी तयार करणे महिलांना बचत गट तयार करून त्याबाबत असणाऱ्या योजनांची माहिती देणे बचत गटातून तयार झाल्यानंतर त्यातून खर्च निर्मिती कशी करायची व बचत गट कसा चालवायचा आणि तो विविध संस्थांना जोडून त्या योजनांचा कसा लाभ घ्यायचा याबाबत संपूर्ण माहिती दिली त्याचप्रमाणे गावातील महिला बचत गट पंचायत समितीला जोडून त्या योजनांचा लाभ घेण्यासाठी माहिती दिली अशा प्रकारे माहिती देत असतांना पंचायत समितीकडून शेळी पालन प्रकरण आणि फळ प्रकरण याबाबत महिलांना माहिती देऊन त्यासाठी लाभ देण्यासाठी माहिती दिली बचत गटातून एकमेकींना कशाप्रकारे कर्ज घेऊन त्या साठी कमी दरात व्याज घेऊन आपला व्यवसाय निर्माण करण्यासाठी प्रयत्न केला महिला बचत गटाला बँकेकडून असलेल्या कर्ज बाबत माहिती दिली बँकेकडून कर्ज घेतल्यानंतर किती दिवस ते मोफत आणि त्यानंतर व्याज असते याबाबत माहिती दिली.**



## ★ गावातील वंचित लोकांची माहिती घेऊन ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या योजनांबाबत माहिती देणे

गावातील घरकुल योजना यांची संपूर्ण माहिती घेऊन म्हणजेच कुटुंबांना भेट देऊन त्यांना घरकुल योजना बाबत माहिती दिली त्याचप्रमाणे त्यासाठी लागणारे आवश्यक कागदपत्रे याबाबत माहिती दिली आणि ते कागदपत्र ग्रामपंचायत मध्ये पोहोचवण्यासाठी मार्गदर्शन केले त्याचप्रमाणे गावातील ग्रामसेवक यांची भेट घेऊन त्या घरकुल योजना ची माहिती घेण्यास सांगितले वंचित आणि दुर्बल कुटुंबांचा विकास होण्यासाठी ग्रामपंचायत अंतर्गत योजना देण्यात आली होती ती या योजनेचा लाभ सर्वांना मिळावा यासाठी ग्रामपंचायत अंतर्गत हाच सर्वे करण्यात आला होता






## ★ <u>गावातील लोकांना गांडूळ खत आणि गोमूत्र संकलन योजना याबाबत माहिती देणे</u>

गावामध्ये आदिवासी समाज असल्याकारणाने त्यांचा व्यवसाय शेती आणि त्याचबरोबर जोड धंदा म्हणून शेळीपालन यासारखे व्यवसाय चालू आहे त्यामुळे गावातील संस्थेमार्फत यांना गोमुत्र संकलन योजनेअंतर्गत 3000 रुपये आणि गांडूळ खत या योजनेसाठी 3700 रुपये रक्कम देण्यात आली होती त्यासाठी नियोजनाबाबत लोकांना माहिती देऊन लवकरात लवकर कागदपत्रे जमा करण्यासाठी माहिती देण्यात आली या संस्थेकडून लोकांना देण्यात आलेली रक्कम आणि त्यांनी केलेले कार्य याबाबत पाहणी करण्यात आली आणि सर्टिफिकेट वाटप करण्यात आली या योजनेचा लोकांना कशा प्रकारे उपयोग झाला या बाबत माहिती घेऊन मार्गदर्शन करण्यात आली त्याच प्रमाणे या संस्थेमार्फत मिळणाऱ्या योजनांचा लाभ लोकांना मिळण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले आणि चालू असलेल्या योजना या विषयी माहिती दिली



## ★ गावातील लोकांना कोरोनाविषाणू संदर्भात जनजागृती केली

गावातील लोकांना कोरोनाविषाणू संदर्भात माहिती दिली त्याचप्रमाणे गावातील आशा सेविका सोबत जाऊन प्रत्येक घरातील लोकांना लसीकरण घेण्यासाठी मार्गदर्शन केले कोरोनाविषाणू साठी  आवश्यक असलेले लसीकरण बाबत सर्वांना माहिती 18 ते 45 वयोगटातील लोकांचा सर्वे करून त्याबाबत गावातील प्राथमिक आरोग्य केंद्र यामध्ये माहिती दिली त्यामुळे लोकांना लसीकरण देण्यासाठी लस उपलब्ध करण्यासाठी सोयीस्कर होईल यासाठी मदत केली या लसीकरणासाठी गावातील ग्रामपंचायत अंतर्गत कार्यक्रमही राबविण्यात आला होता





## ★ गावातील अंगणवाडी सेविका सोबत आरोग्यविषयक उपक्रम घेतले

गावातील अंगणवाडीतील लहान मुले तसे त्यांचे आई-वडील तसेच आजूबाजूला असलेले बाजूला असलेले लोकांना एकत्र करून स्वच्छता विषयी मार्गदर्शन केले तसेच स्वच्छता विषयी मार्गदर्शन केले

अस्वच्छतेमुळे होणारे होणारा परिणाम आणि साथीचे रोग या बाबत माहिती दिली साथीचे रोग कशाप्रकारे पसरतात याबाबत मार्गदर्शन केले आणि त्याबाबत लोकांना असलेल्या समस्या याविषयी माहिती घेऊन त्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न केले



## ★ इतर उपक्रम आणि कार्य

१) गावामध्ये स्वच्छते विषयी मार्गदर्शन

2) गरोदर स्त्रियांना मार्गदर्शन करणे.

3) ग्रामपंचायतीच्या कामांना मदत करणे.

4) अंगणवाडी सेविका सोबत पोषण आहार व अमृत आहार वाटप करणे.

5) कुपोषित मुलांच्या पालकांना मार्गदर्शन करणे अंगणवाडीसेविका सोबत वजन-उंची करणे,.

6) महिला बचत गट पंचायत समिती ला जोडणे.

7) गरोदर आणि स्तनदा मातांना मातृत्व वंदन योजना आणि जननी सुरक्षा योजना बाबत माहिती देणे.

8) ग्रामपंचायत अंतर्गत गावकऱ्यांना एकत्र करून वृक्षारोपण करणे.

9) गावातील लोकांच्या समस्या जाणून त्या समस्या सोडविण्यासाठी लोकांना सहभागी करून घेणे.

10) बचत गटाचा महिलांकडून गावाची स्वच्छता करून घेणे, आणि त्यामध्ये लोकांना सहभागी करणे.

11) आशा सेविका सोबत लसीकरण करण्यासाठी बोलावण्यात जाणे, आणि लसीकरणाबाबत मार्गदर्शन करणे ,आणि गैरसमज दूर करणे.

12) गावामध्ये सांडपाणी व्यवस्थापन बद्दल माहिती देणे, आणि त्याबद्दल मार्गदर्शन करणे.

13) गावामध्ये कोरोना विषयी जनजागृती करणे,

14) गावामध्ये BPL  चा सर्वे करणे, आणि त्याबाबत असणारे योजनांची माहिती देणे.

15) गावामध्ये कुटुंब कल्याण कार्यक्रम.

## ★ निरीक्षण

१) गावातील लोकांना योजनांची माहिती देताना असे लक्षात आले की, लोकांकडे लागणारे कागदपत्र उपलब्ध नाही,.त्यामुळे लोकांना योजनेचा लाभ घेता येत नाही.

२) महिला बचत गट तयार करताना महिलांचा सहभाग होता .परंतु अशिक्षित स्त्रियांचे प्रमाण जास्त असल्याने महिला बचत गट निर्मितीसाठी तयार करावे लागले.

३) गावातील लोकांचा कोरोनामुळे उपक्रमांमध्ये कमी प्रमाणात सहभाग होता असे दिसून आले.

४) गावातील आणि शेजारील गावांमध्ये लसीकरणा मध्ये लोकांचा चांगल्या प्रकारे प्रतिसाद दिसून आला.

५) गावातील ग्रामपंचायती अंतर्गत लोकांना विविध योजना दिल्या जातात असे निरीक्षण आले .

## ★ शिकण्यास मिळालेल्या बाबी

१) गावातील गावातील आरोग्य केंद्रामध्ये आणि गावातील ग्रामपंचायतीच्या कामकाजाची माहिती झाली.

२) मराठी गावातील लोकांशी चर्चा करून त्यावर मार्गदर्शन करण्यास मिळाले आणि समस्या सोडवण्यास मिळाले.

३) गावातील ग्रामपंचायती अंतर्गत घेण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांमध्ये अडचणी समस्या सोडवण्यास मिळाले. त्यामध्ये संवादकौशल्य, वेळेचे नियोजन अहवाल लेखन ,निरीक्षण कौशल्ये ,यांची वाढ झाली.

४) अडचणीच्या अडचणीच्या काळामध्ये लोकांना मदत करण्यास शिकले.

५) गावातील समस्या ओळखून त्या सोडवण्यास मिळाल्या.

६) गावामध्ये उपक्रम घेताना येणाऱ्या समस्या समस्या सोडवण्यात मिळाल्या.

## ★ **क्षेत्र कार्य दरम्यान आलेली आव्हाने**

**१) क्षेत्र कार्य करताना ग्रामपंचायत अंतर्गत घेण्यात येणारे उपक्रम यामध्ये लोकांना सहभागी करणे खूप अवघड होते.**

**२) लोकांना योजनांबाबत माहिती देण्यासाठी जास्त वेळ लागत होता. समजून सांगणे अवघड जात होते.**

**३) लोकांचे शेतीविषयक कामे चालू असल्याने, उपक्रम घेणे अवघड जात होते.**

**४) गावातील महिला बचत गट तयार करण्यासाठी खूप अडचणी आल्या.**

|| धन्यवाद ||